सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२

## महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७

(दिनांक १० ऑक्टोबर १९९६ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XLII of 1987

## The Maharashtra Tax on Entry of Motor Vehicles into Local Areas Act, 1987

(As modified upto 10th October 1996)

# महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


प्रकरण एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.
२. व्याख्या.

प्रकरण दोन

कराचा भार व कर बसविणे

३. कराचा भार.
४. करदायित्व कमी करणे.

प्रकरण तीन

अधिनियमाखालील कर प्राधिकारी

५. कर निर्धारण प्राधिकारी.
६. अपील प्राधिकारी.

प्रकरण चार

कराची विवरणे, आकारणी, प्रदान, वसुली व परतावा

७. विवरणे.
८. निर्धारण.
९. पुनर्निर्धारण.
१०. कर प्रदान.
१०-अ. पदनिर्देशित अधिकारी.
१०-ब. ज्या मोटारीवर आयात कर भरण्यात आलेला नाही अशी मोटार अडकवून ठेवण.
११. कराचा परतावा.
१२. सूट.

प्रकरण पाच

अपिले

१३. अपिले.

प्रकरण सहा

शास्ती

१४. शास्ती.

## प्रकरण सात

### संकीर्ण

१५. या अधिनियमा अन्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.
१६. या अधिनियमानुसार केलेल्या कारवाईस संरक्षण.
१७. नियम करण्याचा अधिकार.
१८. सन १९३९ च्या अधिनियम क्रमांक ४ ची सुधारणा.
१९. सन १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

## सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२[1]

### महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७

[या अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १८ डिसेंबर, १९८७ रोजी मिळाली. संमती १८ डिसेंबर, १९८७ रोजी प्रथम **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चार असाधारण यात प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ (२२ एप्रिल १९८८)*

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (२८ ऑगस्ट १९८९)*

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (२९ जून १९९६)*

**राज्याच्या स्थानिक क्षेत्रांमध्ये वापरासाठी किंवा विक्री करण्यासाठी मोटार वाहने आणण्यावर कर बसविण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याच्या स्थानिक क्षेत्रांमध्ये वापरासाठी किंवा विक्री करण्यासाठी मोटार वाहने आणण्यावर कर बसविणे व तो वसूल करणे यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक झाले आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल, महाराष्ट्राच्या राज्यपालांची कर्तव्ये पार पाडणारे श्री. शरदचंद्र कृष्णप्रसाद देसाई यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर १९८७ रोजी महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अध्यादेश, १९८७ हा प्रख्यापित केला होता ; (१९८७ चा महा. अध्या. क्र. ६.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७" असे म्हणावे. (संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.)

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असेल.

(३) तो ३० सप्टेंबर १९८७ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— (व्याख्या.)

(अ) "उपसाधने" यासंज्ञेचा अर्थ मोटारीतील वातानुकूलक, संगीतयंत्रणा व मोटारवाहनाला जोडलेली आणि मूळ बीजकामध्ये (इनव्हॉईस) समाविष्ट न केलेली इतर कोणतीही वस्तू असा आहे ;

(ब) "अपील प्राधिकरण" यासंज्ञेचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेले "अपील प्राधिकरण" असा आहे ;

(क) "अपील न्यायाधिकरण" यासंज्ञेचा अर्थ मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम २१ अन्वये स्थापन केलेले "महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण" असा आहे ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा. **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग पाच, असाधारण, दिनांक ९ नोव्हेंबर १९८७, पृष्ठ क्र. ३२५. (इंग्रजी)

* अधिनियमाची प्रारंभाची तारीख दर्शवते.

(ड) "कर निर्धारण प्राधिकारी" यासंज्ञेचा अर्थ कलम ५ अन्वये नियुक्त केलेला कोणताही अधिकारी असा आहे ;

(ई) "मुंबई विक्रीकर अधिनियम" यासंज्ञेचा अर्थ, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ असा आहे; १९५९ चा मुंबई ५१.

[1][ (ई-अ) "पदनिर्देशित अधिकारी" यासंज्ञेचा अर्थ कलम १०-अ अन्वये पदनिर्देशित अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेला अधिकारी असा आहे ;]

[2][ (ई-१) "मोटारवाहनांचा व्यापारी' यासंज्ञेचा अर्थ जिचा प्रमुख व्यवसाय, मोटारवाहनांची खरेदी, विक्री किंवा खरेदी-विक्री करणे हा आहे, अशी व्यक्ती असा आहे ;]

(फ) "स्थानिक क्षेत्रामध्ये मोटारवाहन आणणे" या वाक्याचा सर्व व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसहित अर्थ राज्याबाहेर असलेल्या परंतु भारतीय संघराज्य क्षेत्राच्या बाहेर नसेल अशा कोणत्याही ठिकाणाहून, मोटारवाहन, वापरासाठी किंवा विक्री करण्यासाठी, स्थानिक क्षेत्रामध्ये आणणे असा आहे ;

(ग) "आयातकार" यासंज्ञेचा अर्थ राज्याबाहेर असलेल्या परंतु भारतीय संघराज्यक्षेत्राच्या बाहेर नसेल अशा कोणत्याही ठिकाणाहून मोटारवाहन, वापरण्यासाठी किंवा विक्री करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये आणणारी [3][किंवा आणण्यास कारणीभूत ठरणारी] आणि स्थानिक क्षेत्रामध्ये ते वाहन आणण्याच्या वेळी त्याचा मालक असणारी व्यक्ती असा आहे ;

(ह) "स्थानिक क्षेत्र" यासंज्ञेचा अर्थ,—

(एक) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये स्थापन केलेली महानगरपालिका :— १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(दोन) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेली नगरपरिषद ; १९६५ चा महा. ४०.

(तीन) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेली जिल्हा परिषद ; १९६२ चा महा. ५.

(चार) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेली किंवा स्थापन केलेली अधिसूचित क्षेत्र समिती किंवा कटक (कॅन्टोन्मेंट) मंडळ ;

(आय) "मोटार वाहन" यासंज्ञेचा अर्थ मोटार वाहन* अधिनियम, १९३९ याच्या कलम २, खंड (१८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले मोटार वाहन असा आहे आणि यामध्ये मोटारी, मोटार टॅक्सी, मोटार सायकली, मोटार सायकलीशी जोडलेली वाहने, मोटार स्कूटर, मोटरेट, मोटार मिनी बस गाड्या, मोटार व्हॅन, मालमोटारी आणि मोटार वाहनांचे साटे (चॅसिस) व मोटारवाहनांच्या साट्यांवर (चॅसिस) चढविण्यासाठी बांधलेल्या किंवा त्यासाठी असलेल्या मोटारींच्या बॉडीज अथवा टँकर यांचा समावेश होतो, परंतु चाकांवर चालणारे किंवा ट्रॅक्टवर चालणारे ट्रॅक्टर त्यामधून वगळण्यात आले आहेत ; १९३९ चा ४.

---

[1] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम २(अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ९ याच्या कलम ३१ अन्वये हा खंड नेहमीकरिता समाविष्ट केला असल्याचे समजण्यात येईल.

[3] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम २ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

*आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम २ चा खंड (२८) पहा.

(जे) "व्यक्ती" या शब्दात कोणत्याही कंपनीचा किंवा व्यक्तीसंघाचा वा व्यक्तिनिकायाचा समावेश होतो—मग ती/तो विधिसंस्थापित असो वा नसो—तसेच त्यात हिंदू अविभक्त कुटुंब, भागीदारी संस्था, स्थानिक प्राधिकरण किंवा कोणतेही राज्य शासन यांचाही समावेश होतो ;

(क) "विहित" यासंज्ञेचा अर्थ नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ल) "खरेदीची किंमत" यासंज्ञेचा अर्थ मूळ बीजकावरून निश्चित केलेली मोटार वाहनांची किंमत असा आहे व यामध्ये, त्या वाहनाला बसविलेल्या उपसाधनांची किंमत, विम्याची रक्कम, उत्पादन शुल्के, प्रतिशुल्के, विक्रीकर, परिवहन शुल्क, वाहतूक खर्च व मोटार वाहनाच्या खरेदीवर बसविण्यात आलेले सर्व आनुषंगिक खर्च यांचा समावेश होतो.

परंतु, मूळ बीजक उपलब्ध न झाल्यामुळे किंवा सादर न करण्यात आल्यामुळे मोटार वाहनांची किंमत निश्चित करता येण्याजोगी नसल्यास किंवा सादर करण्यात आलेले बीजक खोटे असल्याचे सिद्ध झाल्यास किंवा खरेदीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे मोटार वाहन संपादित करण्यात किंवा मिळविण्यात आलेले असल्यास, त्या बाबतीत त्याच जातीची किंवा दर्जाची मोटार, खुल्या बाजारात ज्या किंमतीला विकण्यात येते किंवा विकली जाऊ शकते तीच किंमत त्या मोटार वाहनाची किंमत असेल ;

(म) "नियम" यासंज्ञेचा अर्थ या अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम, असा आहे ;

(न) "राज्य" यासंज्ञेचा अर्थ महाराष्ट्र राज्य असा आहे ;

(ओ) "कर" यासंज्ञेचा अर्थ या अधिनियमान्वये देय असलेला कर असा आहे ;

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना मुंबई विक्रीकर अधिनियमान्वये नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.

## प्रकरण दोन

### कराचा भार व कर बसविणे

३. (१) या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी यांस अधीन राहून, **कराचा भार.** जी मोटार वापराकरिता किंवा विक्रीकरता एखाद्या स्थानिक क्षेत्रात आणण्यात आली असेल व
१९३९ चा जी, *मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वये राज्यात नोंदणी केली जाण्यास पात्र असेल, अशा
४. मोटार वाहनाच्या खरेदीच्या किमतीवर राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्धारित करील असा दर किंवा असे दर किंवा रुपयावर पंधरा पैसे यांपैकी जो कमी असेल अशा दराने कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल, मात्र, हे दर मुंबई विक्रीकर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये मोटारवाहनांकरिता विहित करण्यात आलेल्या दरांपेक्षा अधिक असणार नाहीत.

१९३९ चा परंतु, *मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वये कोणत्याही संघराज्य क्षेत्रात किंवा कोणत्याही
४. इतर राज्यात नोंदणी करण्यात आलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत, त्या वाहनांची त्या अधिनियमान्वये या राज्यात नोंदणी झाल्याच्या दिनांकापूर्वी पंधरा महिने किंवा त्याहून अधिक मुदतीकरिता कोणताही कर बसविण्यात व वसूल करण्यात येणार नाही.

[1][(२) हा कर, मोटार वाहन स्थानिक क्षेत्रात आणल्यापासून १५ दिवसांच्या आत किंवा १९८८ चा
मोटारवाहन अधिनियम, १९८८ अन्वये वाहनाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्यात येण्यापूर्वी, यांपैकी जी ४.
आधीची असेल त्या मुदतीत या अधिनियमाच्या कलम १० अन्वये घालून दिलेल्या रीतीने आयातकाराकडून देय असेल व त्यांच्याकडून तो देण्यात येईल.]

(३) महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत यांच्याकडून किंवा यथास्थिति, अन्य कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून आपल्या स्थानिक क्षेत्रात जकात कर म्हणून बसविण्यात व वसूल करण्यात आलेल्या कराव्यतिरिक्त हा कर असेल.

---

*आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) पहा.

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ३ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

करदायित्व कमी करणे. ४. (१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेला मोटार आयातकार हा मोटार वाहनांचा विक्रेता असेल व अशा मोटार वाहनाची विक्री केल्यामुळे मुंबई विक्रीकर अधिनियमान्वये कर देण्यास पात्र होत असेल त्या बाबतीत, मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील त्याचे दायित्व हे, त्याने या अधिनियमान्वये दिलेल्या कराच्या रकमेएवढे कमी करण्यात येईल.

(२) ज्याने अन्य कोणत्याही राज्यात स्वत:च्या वापराकरिता मोटार वाहन खरेदी केले असेल अशा, मोटार वाहनांचा विक्रेता नसलेल्या एखाद्या आयातकाराने त्या राज्यात किंवा संघराज्य क्षेत्रात सर्वसामान्य विक्रीकराच्या [1][किंवा केंद्रीय विक्रीकराच्या] संबंधात अंमलात असलेल्या कायद्यान्वये कोणताही कर भरला असल्यास या अधिनियमान्वये आकारणी योग्य असलेली कराची रक्कम, विहित करण्यात येईल अशा शर्तीस अधीन राहून, त्या भरलेल्या कराच्या रकमे-एवढी कमी करण्यात येईल.

## प्रकरण तीन

### अधिनियमाखालील कर प्राधिकारी

कर निर्धारण प्राधिकारी. ५. राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता राजपत्रातील अधिसूचनद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांची कर निर्धारण प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल व त्यांना अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी एक किंवा अनेक क्षेत्रे नेमून देता येतील.

अपील प्राधिकारी. ६. राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांची अपील प्राधिकारी, म्हणून नियुक्ती करता येईल व अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी एक किंवा अनेक क्षेत्रे त्यांना नेमून देता येईल.

## प्रकरण चार

### कराची विवरणे, आकारणी, प्रदान, वसुली व परतावा

विवरणे. ७. [2][(१) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असणारी प्रत्येक व्यक्ती मोटार वाहन स्थानिक क्षेत्रात आणल्यापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ १९८८ चा अन्वये वाहनाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्यात येण्यापूर्वी, यापैकी जे आधी घडले त्यावेळी, विवरण ५९. सादर करील. अशा प्रकारे सादर करावयाचे विवरण हे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा मुदतीकरिता आणि अशा प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.]

(२) या अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, पोट कलम (१) अन्वये विवरण सादर केल्यावर त्यामध्ये कोणतीही त्रुटी किंवा चुकीचे विधान आढळल्यास, मूळ विवरण सादर करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या अखेरच्या दिनांकापासून तीन महिने संपण्या-पूर्वी तिला सुधारित विवरण सादर करता येईल.

निर्धारण. ८. (१) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीकडून देय असलेली कराची रक्कम, विहित करण्यात येईल अशा मुदतीकरिता स्वतंत्रपणे निर्धारित करण्यात येईल.

(२) कर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीने सादर केलेले विवरण अचूक व पूर्ण आहे याबद्दल कर निर्धारण प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, तो अशा विवरणाच्या आधारे, त्या व्यक्तीकडून देय असलेली कराची रक्कम निर्धारित करील.

---

[1]. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २९ याच्या कलम २७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ४ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(३) कर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीकडून सादर करण्यात आलेले विवरण अचूक व पूर्ण असल्याबद्दल कर निर्धारण प्राधिकाऱ्याची खात्री न झाल्यास व त्या व्यक्तीची उपस्थिती किंवा अधिक पुरावा सादर करणे आवश्यक आहे असे त्यास वाटल्यास तो, त्या व्यक्तीवर विहित रीतीने नोटीस बजावून तिला, त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकाला व अशा ठिकाणी उपस्थित राहण्यास व उक्त व्यक्तीस, आपल्या विवरणाच्या पुष्टचर्थ ती ज्यावर अवलंबून असेल असा सर्व पुरावा सादर करण्यास किंवा सादर करण्याची व्यवस्था करण्यास किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेला पुरावा सादर करण्यास फर्मावील. सादर करण्यात आलेला सर्व पुरावा विचारात घेतल्यानंतर निर्धारण प्राधिकारी, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकाला किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर त्या व्यक्तीकडून देय असलेली कराची रक्कम निर्धारित करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यात एखाद्या व्यक्तीने कसूर केल्यास कर निर्धारण प्राधिकारी, स्वविवेकानुसार, कलम २ च्या पोट-कलम (१), खंड (ल) च्या परंतुकान्वये मोटारवाहनाची खरेदी किंमत निर्धारित करील व त्या व्यक्तीकडून देय असलेल्या कराच्या रकमेचे निर्धारण करील.

[१][(४अ) कर भरण्यास पात्र असणारी व्यक्ती, कलम ७ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विवरण सादर करण्यात कसूर करील तर, निर्धारण प्राधिकारी ज्या वित्तीय वर्षात मोटार वाहन आयात करण्यात आले असेल त्या वर्षाच्या अखेरीपासून आठ वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, आयातकारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर आपल्या उत्तम न्यायबुद्धीनुसार त्या व्यक्तीकडून येणे असलेल्या कराची रक्कम (कोणतीही असल्यास) निर्धारित करील.]

(५) विशिष्ट कालावधीची विवरणे सादर करण्याकरिता विहित करण्यात आलेल्या अखेरच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, पोट-कलम (३) किंवा (४) खालील कर निर्धारणाचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही. कोणत्याही कारणामुळे उपरोक्त कालावधीत आदेश काढण्यात न आल्यास, अशा प्रकारे दाखल करण्यात आलेले विवरण हे अशा व्यक्तीकडून देय असलेल्या कराचे निर्धारण करण्याच्या दृष्टीने अचूक व परिपूर्ण म्हणून स्वीकारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**पुनर्निर्धारण.**

९. कर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीचे कलम ८ अन्वये कोणत्याही कालावधीकरिता निर्धारण करण्यात आल्यानंतर, कोणतीही खरेदीची किंमत किंवा तिचा भाग यांचे त्या कालावधीच्या संबंधात निर्धारण करण्याचे राहून गेले आहे किंवा कमी निर्धारण झालेले आहे असे निर्धारण प्राधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर, त्या निर्धारण प्राधिकाऱ्यास, विशिष्ट कालावधीबाबतच्या कर निर्धारण आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत, त्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, आपल्या उत्तम न्यायबुद्धीनुसार त्या व्यक्तीकडून देय असलेल्या कराच्या रकमेचे पुनर्निर्धारण करता येईल.

**कर प्रदान.**

[२][१०. (१) यात यापुढे दिलेल्या रीतीने कर भरण्यात येईल.

(२) कर भरण्यास पात्र ठरलेली व्यक्ती, कलम ७, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विवरण सादर करण्यापूर्वी अशा विवरणानुसार तिच्याकडून देय असलेली कराची संपूर्ण रक्कम विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्या नावाने काढलेल्या दर्शनी मागणी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे, स्थानिक क्षेत्रात असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये किंवा बँकांचे विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे देण्यात आलेले लायसन धारण करणाऱ्या अशा भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यामध्ये व्याख्या केलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेमध्ये किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या सरकारी बँकेमध्ये भरील.

१९४९ चा १०.
१९३४ चा १.
१९६१ चा महा. २४.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २३ द्वारे पोट-कलम (४) नंतर नेहमीकरता समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३० याच्या कलम ५ अन्वये कलम १० ऐवजी ही कलमे दाखल करण्यात आली.

(३) कर भरण्यास पात्र ठरलेली व्यक्ती जर कलम ७, पोट-कलम (२) अनुसार सुधारित विवरण सादर करील आणि जर अशा सुधारित विवरणावरून आधी भरलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक कराची रक्कम देय असल्याचे दिसून येत असेल तर ती व्यक्ती प्रथम अशा सुधारित विवरणानुसार जादा असलेली कराची रक्कम विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या नावाने काढलेल्या मागणी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे स्थानिक क्षेत्रात असलेल्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये भरील.

(४) (एक) कराची पूर्ण रक्कम न भरता विवरण सादर केले असेल त्या बाबतीत देय कराची रक्कम,

(दोन) कोणत्याही कालावधीकरिता कलम ८ अन्वये निर्धारित करण्यात आलेला किंवा कलम ९ अन्वये पुर्ननिर्धारित करण्यात आलेला कर व त्या व्यक्तीकडून अशा कालावधीच्या संबंधात आधीच भरण्यात आलेली रक्कम यांमधील फरकाची रक्कम, आणि

(तीन) कलम १४ अन्वये लादण्यात आलेली, कोणतीही असल्यास, शास्ती,

ही या प्रयोजनाकरिता कर निर्धारण प्राधिकाऱ्याने काढलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापर्यंत त्या व्यक्तीकडून भरण्यात येईल. मात्र हा दिनांक नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा आधीचा असणार नाही. ही रक्कम विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांच्या नावाने काढलेल्या मागणी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे त्या स्थानिक क्षेत्रात असलेल्या, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेच्या कोणत्याही शाखेत भरावयाची असेल.

(५) कोणताही कर किंवा, शास्ती यांची रक्कम, त्यांच्या प्रदानाकरिता नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकानंतरही, प्रदान करण्याची बाकी राहिल्यास ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल व त्या प्रयोजनाकरिता सर्व कर निर्धारण प्राधिकाऱ्यांना, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींअन्वये जिल्हाधिकाऱ्याला असलेले सर्व अधिकार असतील व ते त्यांचा वापर करतील. १९६६ चा महा. ४१.

**पदनिर्देशित अधिकारी.** १०-अ. राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असतील तितके राज्य शासनाचे अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येतील व त्यांपैकी प्रत्येक अधिकाऱ्याला उक्त नोटिशीत किंवा अन्य तत्सम नोटिशीद्वारे विनिर्दिष्ट केलेले एक स्थानिक क्षेत्र किंवा अनेक स्थानिक क्षेत्रे किंवा एखाद्या स्थानिक क्षेत्राचा भाग नेमून देता येईल.

**ज्या मोटारीवर आयातकर भरण्यात आलेला नाही अशी मोटार अडकवून ठेवणे.** १०-ब. कर भरण्यास पात्र असणाऱ्या व्यक्तीने, मोटारीने स्थानिक क्षेत्रात प्रवेश केल्यापासून १५ दिवसांच्या आत किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये त्या वाहनाच्या नोंदणीकरिता अर्ज करण्यापूर्वी, यांपैकी जी मुदत आधीची असेल त्या मुदतीपूर्वी कलम १० अन्वये घालून दिलेल्या रीतीने कर भरण्यात कसूर केल्यास पदनिर्देशित अधिकारी, ज्या वाहनाच्या बाबतीत कर भरावयाचा राहिला असेल ते वाहन ताबडतोब अडकवून ठेवील आणि जोपर्यंत देय व प्रदेय कराची व शास्तीची रक्कम पूर्णपणे भरण्यात येत नाही तोवर ते वाहन अडकवून ठेवील : १९८८ चा ५९.

परंतु, वाहन अडकवून ठेवल्यापासून एक महिन्याच्या आत कराची व शास्तीची रक्कम भरण्यात न आल्यास ते वाहन विहित केलेल्या रीतीने लिलावाद्वारे विकण्याचा व त्या विक्रीचे उत्पन्न हे, कर, शास्ति व खर्चाच्या रकमेच्या वसुलीकरिता वापरण्याचा पदनिर्देशित अधिकाऱ्याला अधिकार असेल. कोणतीही रक्कम उरल्यास ती आयातकारास परत करण्यात येईल :

आणखी असे की, जर वाहनाच्या लिलावापूर्वी, कोणत्याही वेळी, आयातकाराने कर, शास्ती आणि लिलाव करण्यासाठी केलेला खर्च, कोणताही असल्यास, दिला तर पदनिर्देशित अधिकारी वर उल्लेखिलेल्या सर्व देय रकमा आयातकाराकडून पूर्णपणे देण्यात आल्या आहेत याबाबत खात्री करून घेतल्यानंतर लिलाव रद्द करू शकेल आणि आयातकाराला वाहन परत करू शकेल.]

११. एखाद्या व्यक्तीने, तिच्याकडून देय असलेल्या कराच्या व दंडाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम भरलेली असल्यास, करनिर्धारण प्राधिकारी त्या व्यक्तीस कराची वा दंडाची रक्कम परत देईल. असा परतावा रोख रकमेने दिला जाईल अथवा, त्या व्यक्तीच्या मर्जीनुसार, तिच्याकडून अन्य कालावधीसाठी कोणतीही कराची व दंडाची रक्कम देय असल्यास त्या रकमेतून अशी जादा भरलेली रक्कम वजा करून दिला जाईल. कराचा परतावा.

परंतु, प्रथमतः कर निर्धारण प्राधिकारी अशा जादा रकमेचा विनियोग, कलम १० च्या पोट-कलम (४) अन्वये ज्या संबंधात नोटीस देण्यात आलेली असेल अशा कोणत्याही देय रकमेच्या वसुलीसाठी करील आणि मग काही बाकी उरत असल्यास ती उर्वरित रक्कम त्या व्यक्तीस परत करील.

१२. राज्य शासन, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करण्याची आवश्यकता असल्यास, ते स्वतः लादील अशा शर्तींच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गाच्या आयातकारांना, या अधिनियमान्वये देय असलेल्या कराची संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग भरण्यातून किंवा या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींतून सूट देऊ शकेल आणि अशी सूट, ती अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, किंवा त्या अधिसूचनेत नमूद करण्यात येईल अशा अन्य तारखेपासून अंमलात येईल. सूट.

## प्रकरण पाच

### अपिले

१३. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये दिलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरूद्ध करावयाचे अपील, कलम ६ खाली नियुक्त केलेल्या अपील प्राधिकाऱ्याकडे दाखल करण्यात येईल. अपिले.

(२) त्या अपिलात अपील प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या बाबतीतील दुसरे अपील, अपील न्यायाधिकरणाकडे दाखल करण्यात येईल.

(३) ज्या आदेशाविरूद्ध अपील दाखल करावयाचे, तो आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत करदात्याने अपील दाखल केलेले नसेल तर, आणि कराची व असल्यास, दंडाची संपूर्ण रक्कम त्याने शासकीय कोषागारात जमा केलेली नसेल तर, कोणतेही अपील, अपील प्राधिकाऱ्याकडून किंवा अपील न्यायाधिकरणाकडून दाखल करून घेतले जाणार नाही.

(४) विहित करण्यात येतील अशा कार्यपद्धतीच्या नियमांस अधीन राहून प्रत्येक अपील प्राधिकाऱ्याला (पहिल्या व दुसऱ्या या दोन्ही अपिलांच्या बाबतीत) पुढील अधिकार असतील :—

(अ) करनिर्धारणाच्या आदेशाविरूद्धच्या अपिलाबाबत, प्राधिकारी ती निर्धारित रक्कम कायम ठेवील, कमी करील, वाढवील किंवा रद्द करील, किंवा ते करनिर्धारण जमेस न धरता ते प्रकरण, प्राधिकाऱ्याने दिलेल्या निदेशानुसार नव्याने निर्धारण करण्यासाठी करनिर्धारण प्राधिकाऱ्याकडे परत पाठवील आणि करनिर्धारण प्राधिकारी, आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर त्या प्रकरणाचे नव्याने निर्धारण करील व आवश्यक तेथे, अशा नव्या निर्धारणाच्या आधारे देय कराची रक्कम निश्चित करील, आणि

(ब) अन्य कोणत्याही प्रकरणात, अपील प्राधिकारी किंवा यथास्थिति, अपील न्यायाधिकरण त्या अपिलाबाबत त्यास न्याय्य व योग्य वाटतील असे आदेश देईल.

## प्रकरण सहा

### शास्ती

१४. (१) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र ठरणाऱ्या एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर केली तर, करनिर्धारण प्राधिकारी अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, त्या शास्ती.

व्यक्तीवर, देय कराच्या रकमेच्या जोडीला आणखी, कराच्या रकमेच्या दुपटीहून अधिक होणार नाही एवढया रकमेची शास्ती लेखी आदेशाद्वारे लादू शकेल.

[1][ (२) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेल्या एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये आवश्यक असलेल्या ठराविक मुदतीत कर भरण्यात कसूर केली तर, ती व्यक्ती, अशा कराच्या आणि पोट-कलम (१) खालील शास्तिच्या, कोणतीही असल्यास, रकमे व्यतिरिक्त, तिने ज्या तारखेपर्यंत कर भरावयास पाहिजे होता त्या तारखेनंतरच्या प्रत्येक महिन्या साठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या रकमेच्या दोन टक्के इतक्या रकमेइतके सरळ व्याज देण्यास पात्र ठरेल.]

(अ) त्या व्यक्तीने ज्या तारखेपर्यंत कर भरणे आवश्यक होते, त्या तारखेनंतरच्या पहिल्या तीन महिन्यांकरिता, दरमहा कराच्या रकमेच्या दीड टक्का इतकी रक्कम ; आणि,

(ब) त्यापुढील जेवढे महिने ती व्यक्ती कर प्रदानात कसूर करीत राहील, त्या प्रत्येक महिन्याकरिता, कराच्या रकमेच्या दोन टक्के इतकी रक्कम.

## प्रकरण सात

### संकीर्ण

या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

१५. या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेले सर्व अधिकारी व कर्मचारी भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

या अधिनियमानुसार केलेल्या कारवाईस संरक्षण.

१६. या अधिनियमान्वये सद्हेतुने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृती-बद्दल शासनाविरूद्ध किंवा कोणत्याही लोकसेवकाविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कार्य-वाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

१७. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधि-सूचनेद्वारे पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील ;

परंतु, तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्या-बद्दल राज्य शासनाची खात्री झाली असेल तर ते या कलमान्वये करावयाच्या कोणत्याही नियमाच्या बाबतीत पूर्व प्रसिद्धीची अट काढून टाकू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता या नियमात पुढील गोष्टींसाठी तरतुद करण्यात येईल. उदा :—

(अ) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार ;

(ब) या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे विहित करणे आवश्यक असलेल्या किंवा परवानगी दिलेल्या सर्व बाबी ;

(क) या अधिनियमान्वये अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीचे आणि त्या कार्यपद्धतींमध्ये स्वीकृत करण्यात यावयाच्या नमुन्यांचे सर्वसाधारणपणे विनियमन करणे ;

(ड) ज्यासाठी या अधिनियमामध्ये कोणतीही तरतुद केलेली नाही किंवा पुरेशी तरतूद केलेली नाही आणि या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी ज्या बाबीसाठी तरतूद करणे राज्य शासनाच्या मते आवश्यक आहे, अशी फी लादण्यासह कोणतीही इतर बाब ;

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २४ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(ई) अपील निकालात काढण्यास आनुषंगिक अशा (फी धरून) कोणत्याही इतर बाबींसाठी कार्यपद्धती आणि अपिलाच्या ज्ञापनासाठी लागणाऱ्या न्यायालय शुल्क मुद्रांकाचे मूल्य ठरवणे ;

(फ) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात कोणत्याही प्राधिकरणासमोर, उपस्थित राहू शकेल किंवा हजर होऊ शकेल अशी व्यक्ती व ज्यांना अधीन राहून त्या व्यक्तीस उपस्थित राहण्याचा आणि हजर राहण्याचा हक्क असेल त्या अर्हता व शर्ती आणि अशा व्यक्तीस हजर राहण्यास प्राधिकृत करण्याबाबतच्या प्राधिकारपत्राचा नमुना.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील आणि राजपत्रात असा निर्णय अधिसूचित करतील, तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिति अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

सन १९३९ च्या अधिनियम क्रमांक ४ ची सुधारणा.

१९३९ चा ४. १८. मोटार वाहन अधिनियम, १९३९, हा महाराष्ट्र राज्याला लागू करताना त्याच्या पहिल्या अनुसूचीमधील,—

(अ) नमुना ई मध्ये नोंद १ख नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

१९८७ चा महा. ४२. "१ग. महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणीकृत मालक म्हणून नोंदणी व्हावयाच्या व्यक्तीने ते मोटार वाहन खरेदी केले आहे किंवा नाही आणि जर, तसे खरेदी केले नसेल तर, "महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७" अन्वये त्या व्यक्तीने नोंदणीकृत मालक म्हणून कर भरला आहे किंवा नाही."

(ब) नमुना च मध्ये खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

१९८७ चा महा. ४२. "(घ) महाराष्ट्र राज्याच्या बाहेरून मोटार वाहन प्रथम विकत घेतले होते किंवा नाही आणि, जर घेतले असेल तर, "महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७"........अन्वये अर्जदाराने कर भरला आहे किंवा नाही."

सन १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

१९८७ चा महा. अध्या. ६. १९. (१) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावर कर अध्यादेश, १९८७ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये, करण्यात आलेला (कोणताही नियम, विनियम, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश किंवा करण्यात आलेली कोणतीही नेमणूक यासह) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आल्याचे किंवा काढण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई